सत्यमेव जयते

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

**" परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत " या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा**

# अहवाल

(दिनांक मार्च, २०१८ रोजी विधानपरिषदेस सादर करण्यात आला.)

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

विधान भवन, मुंबई

मार्च, २०१८

# विधानपरिषद विनंती-अर्ज समिती

(२०१७-२०१८)

" परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत " या विषयावरील
ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांच्या विनंती अर्जावरील विधानपरिषद
विनंती अर्ज समितीचा

# अहवाल

## विधानपरिषद विनंती अर्ज समिती
## (२०१७-२०१८)

१. श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

२. श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

३. प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

४. श्री. नरेंद्र पाटील, वि.प.स.

५. श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

*१. ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स.

*२. ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**३. प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय :**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव
श्री. यु. के. चव्हाण, सचिव (EM)
श्री. विलास आठवले, उप सचिव
श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)
श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

* ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. व ॲड, हुस्नबानू खलिफे, वि.प.स, यांची दिनांक ३ नोव्हेंबर, २०१७ रोजी विशेष निमंत्रित सदस्य म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

** प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स. यांची दिनांक ३१ जानेवारी, २०१८ रोजी विशेष निमंत्रित म्हणून नामनियुक्ती करण्यात आली आहे.

**विधानपरिषद विनंती अर्ज समिती**

**(२०१६-२०१७)**

१. श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

२. * श्री. गिरीष व्यास, वि.प.स.

३. * प्रा. डॉ. तानाजी सावंत, वि.प.स.

४. * श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

५. प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

६. श्री. कपिल पाटील, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयः-**

डॉ. अनंत कळसे, प्रधान सचिव

श्री. विलास आठवले, उप सचिव

श्री. यु. के. चव्हाण, सचिव

श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी

---

* सर्वश्री पांडुरंग फुंडकर, प्रकाश बिनसाळे, अमरनाथ राजुरकर, वि.प.स. यांच्या रिक्त झालेल्या जागी अनुक्रमे सर्वश्री गिरीष व्यास, तानाजी सावंत, आनंद ठाकूर, वि.प.स. यांची २७ जानेवारी, २०१७ रोजी नामनियुक्ती करण्यात आली आहे.

## प्रस्तावना

" परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत " या विषयावरील विनंती अर्जाची सूचना सन्माननीय सदस्य ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिली व दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती-अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती-अर्ज त्याच दिवशी विनंती-अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट एक)

विनंती अर्जात उपस्थित करण्यात आलेल्या मुद्यांबाबत शासनाकडून आवश्यक ती माहिती मिळावी म्हणून उक्त विनंती अर्ज ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभागाकडे पाठविण्यात आला. या संबंधीची माहिती विभागाकडून दिनांक ९ जून, २०१७ व दिनांक २२ फेब्रुवारी, २०१८ रोजी प्राप्त झाली.

समितीने विनंती-अर्जाच्या संदर्भात विनंती अर्ज सादर करणाऱ्या मूळ विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव, जिल्हाधिकारी, यवतमाळ व अन्य अधिकाऱ्यांच्या दिनांक १२ जून, २०१७ व दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी साक्षी नोंदविल्या.

विनंती अर्जासंबंधी विभागाने पाठविलेली माहिती (परिशिष्ट दोन) तसेच साक्षीच्या वेळी समितीस मिळालेली अधिक माहिती याचा सर्वंकष विचार करून समितीने अहवाल तयार केला व दिनांक २० मार्च, २०१८ रोजीच्या बैठकीत संमत केला.

**विधान भवन :**
मुंबई,
दिनांक २० मार्च, २०१८.

**माणिकराव ठाकरे,**
उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा
समिती प्रमुख विनंती अर्ज समिती.

**अहवाल**

मी विधानपरिषद विनंती अर्ज समितीचा समिती प्रमुख, समितीच्या वतीने हा अहवाल सादर करीत आहे.

**" परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत "** या विषयावरील विनंती अर्जाची सूचना ॲड. रामहरी रूपनवर, वि.प.स. यांनी दिनांक ७ मार्च, २०१७ रोजी दिली व दिनांक ७ एप्रिल, २०१७ रोजी प्रस्तुतचा विनंती-अर्ज सन्माननीय सदस्यांनी विधानपरिषदेस सादर केला. सदर विनंती-अर्ज त्याच दिवशी विनंती-अर्ज समितीकडे सुपूर्द करण्यात आला. (परिशिष्ट एक)

अर्जदाराने विनंती अर्जात नमूद केले आहे की, परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणे आवश्यक आहे.

सदर विषय परजना ता. नेर जि. यवतमाळ येथील गावकऱ्यांच्या निवेदनानुसार परजना, ता. नेर येथे पाझर तलावाकरिता ग्रामपंचायतमध्ये याबाबत ठराव झालेला आहे. परजना येथे पाण्याची टंचाई असल्याने पाझर तलावाची निर्मीती केल्यास शेतीसाठी पाण्याची पातळी वाढेल व जनावरांकरिता पाण्याची व्यवस्था होईल. शासनास वारंवार निवेदने देऊनही कोणतीही दखल घेतली नाही. ता. नेर, जि. यवतमाळ येथील शेतकऱ्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर ठिकाणी पाझर तलाव होणे आवश्यक आहे.

तरी कृपया आपण सदर विषयात लक्ष घालून महाराष्ट्र विधानपरिषदेच्या विनंती अर्ज समितीमार्फत आमच्यावरील झालेल्या अन्यायाचे निवारण करावे व आम्हास पाझर तलाव करून मिळण्याबाबत सहकार्य करावे अशी विनंती उक्त अर्जात केलेली आहे.

समितीच्या दिनांक १२ जून, २०१७ रोजीच्या बैठकीच्या वेळी जलसंधारण विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन अ) नमूद केले आहे की, मौजे परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होण्याबाबत, या विषयाच्या अनुषंगाने लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती यांनी लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, यवतमाळ यांना कार्यस्थळाची पाहणी करून अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, यवतमाळ यांनी ही योजना ० हेक्टर ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेची असल्याने पुढील कार्यवाही कार्यकारी अभियंता, लघु सिंचन, जिल्हा परिषद विभाग, यवतमाळ यांनी करावी असे कळविले आहे.

मौजे परजना ता. नेर येथे पाझर तलावासाठी दोन स्थळे उपलब्ध आहेत. त्यापैकी भितखोरी येथील स्थळ वन जमिनीत येत असल्याने या स्थळी पाझर तलाव घेणे शक्य नाही. म्हणून दुसरे स्थळ परजना गावाच्या उत्तरेस उपलब्ध असून कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जिल्हा परिषद, विभाग यवतमाळ यांचे अखत्यारीत जिल्हा परिषद, सिंचन उप विभाग, दारव्हा यांनी दिनांक ०१/०६/२०१७ ते ०३/०६/२०१७ या कालावधीत या स्थळी योजनेचे सर्वेक्षण, सरपंच मौजे परजना यांचे उपस्थितीत केले आहे. नियोजित पाझर तलावाचे अक्षांश २०° २९’ ४८” व रेखांश ७७° ५१’ ३१” असे आहे.

या नियोजित पाझर तलावासाठी सर्वश्री जवाहर भिकाजी राठोड, शंकर पुणाजी राठोड, शुकराज मुन्ना राठोड, दिपक वामन चव्हाण, महादेव पुन्ना राठोड यांची अंदाजे ७-८ हेक्टर जमीन संपादित करणे आवश्यक आहे. या शेतकऱ्यांनी नियोजित तलावासाठी जमीन देण्याबाबतचे संमतीपत्र दिलेले आहे.

सद्यःस्थितीत या नियोजित पाझर तलावाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरू आहे. सविस्तर अंदाजपत्रक तयार झाल्यावर हे काम सन २०१८-१९ च्या नियोजन समितीच्या आराखड्यात समाविष्ट करण्यात येवून अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजुरी व निविदा इत्यादी कार्यवाही करून काम सुरू करण्याचे नियोजन आहे.

समितीच्या दिनांक १२ जून, २०१७ रोजीच्या बैठकीच्या वेळी जलसंधारण विभागाच्या सचिवांनी बैठकीत असे निर्दशनास आणून दिले की, ज्या जागेवर पाझर तलावाचे नियोजन केले आहे ती जमीन शेतकऱ्यांची आहे. या तलावासाठी ८ हेक्टर जमिनीची आवश्यकता आहे. ही जमिन येथील शेतकऱ्यांची आहे. पाझर तलाव करण्याकरिता दोन साईट उपलब्ध आहेत. त्यापैकी भितखोरी येथील स्थळ वनजमिनीत येत असल्याने येथे पाझर तलाव घेणे शक्य नाही. त्यामुळे दुसरे स्थळ निश्चित केले आहे. त्याचा सर्व्हे केला असून एस्टीमेट तयार केलेले आहे. हे एस्टीमेट १०-१५ दिवसात पूर्ण होणार आहे. डिपीडिसीच्या मान्यतेने हे काम करावयाचे आहे. भूसंपादन करून त्याची किंमत अदा करावयाची आहे. जमिनीची किंमत धरून अंदाजे २ कोटी रूपयापर्यंत हा प्रकल्प जाणार आहे. याकरिता २० लाख रूपये प्रति हेक्टर अशी किंमत निश्चित करण्यात आलेली आहे.

परजना गावात पाणी टंचाई असून शेतकरी पाण्यासाठी आपली जमीन देत आहे व या सर्व शेतकऱ्यांची संमंती प्राप्त झालेली आहे. असे एकूण सहा शेतकरी यांची सात ते साडे सात हेक्टर जमीन आहे. काही अंशता जमीन संपादित करावी लागणार त्यासाठी विभागास शिफारस करावी.

याबाबत समितीने सुचविले की, दोन कोटी रूपयांपैकी १ कोटी या वर्षी घ्यावे व पुढील वर्षी १ कोटी रूपये घ्यावेत. तांत्रिक व प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर घेवून तलावाचे काम २०१७-१८ मध्ये झाले पाहिजेत. या प्रकरणाचे गांभीर्य प्रशासनाने जरूर लक्षात घ्यावे सदर प्रकरण फार गंभीर असल्यामुळे समितीनेही ते अतिशय गांभीर्याने घेतले आहे. या संदर्भात पुढील बैठकीत माहिती सादर करू असे विभागीय सचिवांनी आश्वासित केले.

समितीच्या दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजीच्या बैठकीच्या वेळी जलसंधारण विभागाने पाठविलेल्या माहितीत (परिशिष्ट-दोन ब) नमूद केले आहे की, सदर पाझर तलावाचे सर्वेक्षण करून अंदाजपत्रक तयार करण्यात आले. अंदाजपत्रक शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मापदंडात असफल आहे. भुसंपादनाचे वाढीव किंमतीमुळे आर्थिक दृष्टया असफल होत आहे. परंतु, विधानपरिषद विंनती अर्ज समितीने विनंती केल्यानुसार सदर पाझर तलावास विशेष बाब म्हणून अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ अमरावती यांचेकडून जावक क्रमांक /३५९६/प्र.शा.-५/ सन २०१७ दिनांक ३०/११/२०१७ अन्वये एकूण किंमत २,६२,५८,९०० रूपयास तांत्रिक अनुमती प्रदान करण्यात आलेली आहे.

पाझर तलावासाठी एकूण ७.४५ हेक्टर खाजगी जमीन संपादित करणे आवश्यक आहे. भूसंपादना करिता एकूण १,६३,६८,२५० रूपयांची आवश्यकता आहे. सदर पाझर तलावाचे काम हे सन २०१८-१९ च्या जिल्हा नियोजन समितीच्या २७०२-ल.पा.सामान्य या शिर्षकाखाली समाविष्ट करण्यात आलेले आहे. या कामासाठी ३०.०० लक्ष निधीची मागणी करण्यात आलेली आहे. सदर निधी व भूसंपादन निधी प्राप्त झाल्यानंतर अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता घेण्याकरिता जिल्हा परिषद सर्वसाधारण सभेमध्ये ठेवण्यात येणार आहे.

यावर समितीने आपले मत व्यक्त केले आहे की, कार्यकारी अभियंता यांनी प्रस्तावाला तांत्रिक अनुमती दिली आहे, त्यामुळे तांत्रिक दृष्ट्या प्रोजेक्ट परिपूर्ण आहे. केवळ भूसंपादनाच्या वाढीव किंमतीमुळे आर्थिकदृष्ट्या असफल होत आहे. परंतु विशेष बाब म्हणून तांत्रिक अनुमती प्रदान केली आहे हाच मुद्दा पुढे नेऊन विशेष बाब म्हणून वित्त व नियोजन विभागाकडे प्रकरण पाठवून हे प्रकरण यशस्वीपणे निकाली काढून गावकऱ्यांसाठी पाझर तलाव करण्यास काहीही हरकत नाही.

**अभिप्राय व शिफारशी :**

मौजे परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाण्याची टंचाई असल्याने तेथे पाझर तलाव होणे आवश्यक असल्याचे विनंती अर्जदारांनी आपल्या अर्जात नमूद केले आहे. पाझर तलाव झाल्यास शेतीसाठी पाण्याची पातळी वाढेल व तेथील जनावरांकरिता पाण्याची व्यवस्था होईल. असेही अर्जदारांनी नमूद केले आहे.

पाझर तलावासाठी दोन स्थळापैकी भितखोरी येथील स्थळ वन जमिनीत येत असल्याने तेथे पाझर तलाव होणे शक्य नाही. त्यामुळे दुसरे एक स्थळ निश्चित केले आहे. त्याचा सर्व्हे केला असून अंदाजपत्रक तयार केलेले आहे. व हे काम जिल्हा नियोजन समितीच्या मान्यतेने करावयाचे आहे. या करीता ८ हेक्टर खाजगी जमिनीचे संपादन करावे लागणार असून संबंधित शेतकऱ्यांनी संमती पत्र दिले आहे. याकरीता २० लाख रूपये प्रति हेक्टर अशी किंमत निश्चित करण्यात आली आहे.त्यामुळे प्रकल्पाची किंमत २ कोटी रूपयांपर्यंत जाते.

१०० हेक्टर पेक्षा कमी सिंचन क्षमता असणारा प्रकल्प जिल्हा परिषदेद्वारे राबविला जातो. १०० ते २५० हेक्टी सिंचन क्षमता असणारा प्रकल्प राज्य योजनेद्वारे राबविला जात असल्याचे साक्षीच्या वेळी विभागीय सचिवांनी नमूद केले आहे. या प्रकल्पाची १०० हेक्टर सिंचन क्षमता असल्याने डीपीडीसी मधून २ वर्षात हा प्रकल्प पूर्ण करता येऊ शकतो. दिनांक १२ जून, २०१७ रोजीच्या समितीच्या बैठकीत विभागीय सचिवांना निदेश दिले की, तेथील शेतकऱ्यांसाठी सदर प्रकल्प अतिशय महत्वाचा आहे व हा प्रकल्प लवकरात लवकर पूर्ण होण्याच्या दृष्टीने आमसभेकडून प्रशासकीय मान्यता घेण्यापूर्वी या प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधीची तरतूद करण्यात यावी. ज्या वेळी जिल्हा नियोजन समितीकडे निधी उपलब्ध असेल अशा वेळी त्यांच्याकडे निधी मंजूरीसाठी प्रस्ताव पाठविण्यात यावा. अशी समितीची शिफारस आहे.

समितीने दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी विभागीय सचिवांची पुन्हा साक्ष घेतली. त्यावेळी विभागीय सचिवांनी सदर प्रकल्पाबाबत अद्यावत माहिती देताना नमूद केले की, गेल्या बैठकीत समितीने दिलेल्या निदेशानुसार सदर प्रकल्पाबाबत दिनांक २३ जून, २०१७ रोजी जिल्हाधिकारी, यवतमाळ यांना एक विशेष पत्र देण्यात आले आहे. त्या पत्राच्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता यानी अंदाज पत्रक तयार करून ते अधीक्षक अभियंता यांचेकडे सादर केले होते. अधीक्षक अभियंता यांनी २ कोटी ६२ लाख रूपयांच्या अंदाजपत्रकाला विशेष बाब म्हणून तांत्रिक मान्यता दिली आहे. आता ते जिल्हा परिषद, यवतमाळकडे जाणार आहे. यामध्ये फक्त एकच आहे की ते मापदंडामध्ये सफल होत नाही. अशा असफल प्रकल्पाबाबत वित्त व नियोजन विभागाची मान्यता घेऊन व्यय-अग्रक्रम समिती त्याला मान्यता देते. सदर बैठकीत अंदाजपत्रक सन २०१३-२०१४ च्या दरसूची नुसार केले असल्याचा मुद्दा उपस्थित करण्यात आला. तथापि, आता सन २०१७-२०१८ च्या दरसूची नुसार पाठवण्याबाबत समितीने सूचित केले.

आता पर्यंत समितीने सदर प्रकरणी विभागीय सचिवांसोबत दोन बैठका घेतल्या. या दोन्ही **बैठकीत विभागीय सचिवांनी व संबंधित अधिकाऱ्यांनी समितीला वेळोवेळी वस्तुस्थिती दर्शक व योग्य माहिती पुरविली तसेच समितीला अतिशय सकारात्मक प्रतिसाद दिला त्यामुळे समिती याबाबत समाधान व्यक्त करते.**

परजना (ता. नेर, जि. यवतमाळ) या गावामध्ये खूप वर्षापासून पिण्याच्या पाण्याची टंचाई आहे. तेथील शेतकऱ्यांस मुबलक पाण्याची व्यवस्था केली तर तेथील शेतकरी चांगल्या प्रकारे शेतीतून मोठया प्रमाणावर उत्पन्न काढू शकतात. शेतीच्या व पिण्याच्या पाण्यासाठी परजना गावामध्ये पाझर तलाव करण्यात यावा अशी बऱ्याच वर्षापासूनची तेथील शेतकऱ्यांची मागणी आहे.

सदर प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन समितीकडून निधी प्राप्त होत नसेल तर विशेष बाब म्हणून शासनाकडून निधीची तरतूद केली पाहिजे. कारण हे शेतकरी गरीब असून अल्पभूधारक आहेत. त्यांच्या पिण्याच्या पाण्याची व शेतीसाठी लागणाऱ्या पाण्याची सोय होणे अत्यंत गरजेचे आहे. सदर प्रकल्पाच्या २ कोटी ६२ लाख रूपयांच्या अंदाजपत्रकाला विशेष बाब म्हणून तांत्रिक मान्यता दिली आहे. तथापि, ते मापदंडामध्ये सफल होत नाही. **असे असले तरी काही ठिकाणची भौगोलिक परिस्थती व तेथील गरज या दृष्टीकोनातून विचार केला तर काही अटी व शर्ती शिथिल करण्याबाबत विभागाने सकारात्मक भूमिका घ्यावी. त्याचप्रमाणे सदर प्रकल्पाच्या संदर्भात वित्त व नियोजन विभागाची मंजुरी घेऊन व्यय-अग्रक्रम समितीची मान्यता घेण्याची कार्यवाही तातडीने करून प्रकल्पाच्या कामास लवकरात लवकर सुरूवात करण्यात यावी. अशी समितीची आग्रहाची शिफारस आहे व याबाबत केलेल्या कार्यवाहीचा अहवाल समितीस दोन महिन्यात पाठविण्यात यावा.**

## परिशिष्ट एक

# मूळ विनंती अर्ज

## परिशिष्ट-एक

महाराष्ट्र विधानपरिषद

विधानपरिषद महाराष्ट्र

वि.प.स. ९

प्रति:

मा. सभापती,
महाराष्ट्र विधानपरिषद,
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन, मुंबई-४०० ०३२.

विषय :- परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत.

मा. महोदय,

परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथील गावकऱ्यांच्या शेतकऱ्यांचे निवेदन सोबत जोडले आहे. त्यांच्या निवेदनानुसार परजना, ता. नेर येथे पाझर तलाव करिता ग्राम पंचायत मध्ये आमसभेमध्ये ठराव झालेला आहे. परजना येथे पाण्याची टंचाई आहे. परजना येथे पाझर तलावाची निर्मिती केल्यास शेतीसाठी पाण्याची पातळी वाढेल व जनावरांकरिता पाण्याची व्यवस्था होईल असे त्यांनी निवेदनात व्यक्त केले आहे. त्यांनी याबाबतीत सरकारकडे अनेक निवेदने दिली असून सदरील बाबतीत कोणतीही दखल घेतली गेली नाही.

तरी मौजे परजना, ता. नेर, जि. यवतमाळ येथील शेतकऱ्यांच्या निवेदनाच्या अनुषंगाने सदर प्रकरणी पाझर तलाव होण्यासंदर्भात उपरोक्त विषय विनंती अर्ज समितीकडे आपल्या शिफारशीसह पाठवण्यात यावा, ही विनंती.

आपला,

( रामहरी रुपनवर )
वि.प.स.

सभापती
महाराष्ट्र विधानपरिषद

(2)

प्रति,

मा. रामहरी रुपनवर

विधान परिषद सदस्य,

विधानभवन, मुंबई

विषय :- परजना ता. नेर जि. यवतमाळ येथे पाझर तलाव मंजूर होणे बाबत

महोदय,

आम्ही परजना येथील गावकरी विनंती करतो की परजना ता. नेर येथे पाझर तलाव करिता ग्राम पंचायत मध्ये ग्राम सभे मध्ये ठराव झालेला आहे, परजना येथे पाण्याचा टंचाई आहे. परजना येथे पाझर तलाव झाल्यास शेतीसाठी पाण्याची पातळी वाढेल व जनावरांना सुद्धा पाण्याची व्यवस्था होईल. तरी परजना येथे पाझर तलाव करण्यात या ही विनंती.

दिनांक :-

| नाव : | सही |
|---|---|
| १. परशराम रूपसिंग राठोड | [signature] |
| २. जवाहर भिका राठोड | [signature] |
| ३. मोतीराम रामकृष्ण चव्हाण | [signature] |
| ४. शंकर मुना राठोड | [signature] |
| ५. पंडीत सुर्यभान नायक | P. S. Jadhav |

## परिशिष्ट दोन

# विभागाने सादर केलेली माहिती

(शा.म.मु.) एचबी ३३५०–२ (३५०–३-२०१८)

# परिशिष्ट-दोन अ

महाराष्ट्र शासन

विधानमंडळ प्राथम्य
बैठक : सोमवार, दिनांक १२ जून, २०१७
फोन : ०२२/२२७९३०१३
Email : shamrao.patil@nic.in

क्रमांक-लपायो-२०१७/ प्र.क्र. ८२ /जल-३
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक- ०९ जून, २०१७.

प्रति,
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
बॅकवे रेक्लमेशन, मुंबई

विषय :- "परजना, ता.नेर, जि.यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत" या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, मा. विधानपरिषद सदस्य यांचा विनंती अर्ज.

संदर्भ :- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचे पत्र क्र.१५९८५/म.वि.स./विपविअस/ड-१५,दिनांक ०६ जून, २०१७.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भाधीन पत्रांचे अनुषंगाने विधानपरिषद विनंती अर्ज समितीची सोमवार, दिनांक १२ जून, २०१७ रोजी दुपारी २.०० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीसाठी विनंती अर्जातील विषयाबाबतच्या अद्ययावत माहितीच्या ४० प्रती या पत्रासोबत सविनय पाठविण्यात येत आहेत.

आपला,

(शा.र.पाटील)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी अग्रेषित,
१. मा.सचिव (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.
२. सह सचिव (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.
३. अवर सचिव (जल-३), ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मुंबई.

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक सोमवार, दिनांक १२ जून, २०१७ रोजी दुपारी २.०० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई

विषय :- "परजना, ता.नेर, जि.यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत" या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, मा. विधानपरिषद सदस्य यांचा विनंती अर्ज.

अद्ययावत माहिती

मौजे परजना ता. नेर जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होण्याबाबत ॲड.रामहरी रूपनवर, मा.विधानपरिषद सदस्य यांनी संदर्भ मा. सभापती महाराष्ट्र विधानपरिषद, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन मुंबई यांचेकडे मागणी केली आहे. सदर मागणीचे अनुषंगाने लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ, अमरावती यांनी लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, यवतमाळ यांना कार्यस्थळाची पाहणी करुन अहवाल सादर करण्याचे निर्देश दिले. त्या अनुषंगाने कार्यकारी अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) विभाग, यवतमाळ यांनी ही योजना ० हेक्टर ते १०० हेक्टर सिंचन क्षमतेची असल्याने पुढील कार्यवाही कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जिल्हा परिषद, विभाग यवतमाळ यांनी करावी असे कळविले आहे.

मौजे परजना ता. नेर येथे पाझर तलावासाठी दोन स्थळे उपलब्ध आहेत. त्यापैकी भितखोरी येथील स्थळ वनजमिनीत येत असल्याने या स्थळी पाझर तलाव घेणे शक्य नाही. म्हणुन दुसरे स्थळ परजना गावाच्या उत्तरेस उपलब्ध असून कार्यकारी अभियंता, लघु सिंचन जिल्हा परिषद, विभाग यवतमाळ यांचे अखत्यारीत जिल्हा परिषद, सिंचन उपविभाग, दारव्हा यांनी दिनांक ०१/०६/२०१७ ते ०३/०६/२०१७ या कालावधीत या स्थळी योजनेचे सर्वेक्षण, सरपंच मौजे परजना यांचे उपस्थितीत केले आहे. नियोजित पाझर तलावाचे अक्षांश २०° २९' ४८" व रेखांश ७७° ५१' ३१" असे आहे.

या नियोजित पाझर तलावासाठी सर्वश्री जवाहर भिकाजी राठोड, शंकर पुणाजी राठोड, शुकराज मुन्ना राठोड, दिपक वामन चव्हाण, महादेव पुन्ना राठोड यांची अंदाजे ७-८ हेक्टर जमिन संपादित करणे आवश्यक आहे. या शेतकऱ्यांनी नियोजित तलावासाठी जमिन देण्याबाबतचे संमतीपत्र दिलेले आहे.

सद्य:स्थितीत या नियोजित पाझर तलावाचे सविस्तर अंदाजपत्रक तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावर सुरु आहे. सविस्तर अंदाजपत्रक तयार झाल्यावर हे काम सन २०१८-१९ च्या नियोजन समितीच्या आराखड्यात समाविष्ट करण्यात येवून अंदाजपत्रकास प्रशासकीय मान्यता, तांत्रिक मंजुरी व निविदा इत्यादि कार्यवाही करुन काम सुरु करण्याचे नियोजन आहे.

----------------

**परिशिष्ट-दोन ब**

महाराष्ट्र शासन

विधानमंडळ प्राथम्य
बैठक : शुक्रवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८
फोन : ०२२/२२७९३०१३
Email : prakash.kadarkar@nic.in

क्रमांक-लपायो-२०१७/ प्र.क्र. ८२ /जल-३
मृद व जलसंधारण विभाग,
हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२,
दिनांक- २२ फेब्रुवारी, २०१८.

प्रति,
अवर सचिव (समिती),
महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय,
विधान भवन,
बॅकवे रेक्लमेशन, मुंबई

विषय :- "परजना, ता.नेर, जि.यवतमाळ येथे पाझर तलाव होणेबाबत" या विषयावरील ॲड. रामहरी रूपनवर, मा. विधानपरिषद सदस्य यांचा विनंती अर्ज.

संदर्भ :- महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचे पत्र क्र.४८२५/म.वि.स./विपविअस/ड-१५,दिनांक ७ फेब्रुवारी, २०१८.

महोदय,

उपरोक्त विषयी संदर्भाधीन पत्रांचे अनुषंगाने विधानपरिषद विनंती अर्ज समितीची शुक्रवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी १.०० वाजता, कक्ष क्रमांक ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीसाठी विनंती अर्जातील विषयाबाबतच्या अद्ययावत माहितीच्या ४० प्रती या पत्रासोबत सविनय पाठविण्यात येत आहेत.

आपला,
(स.रा.शिंदे) २२/०२/१८
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत माहितीसाठी अग्रेषित,
१. मा.सचिव (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.
२. सह सचिव (जलसंधारण) यांचे स्वीय सहाय्यक.

## मौजा परजना ता.नेर जि.यवतमाळ येथे पाझर तलाव होणे बाबतची अद्यावत माहिती

"मौजा परजना ता. नेर जि. यवतमाळ येथे पाझर तलाव होणे बाबत" ॲड.रामहरी रुपनवर, मा. विधानपरिषद सदस्य यांनी मा. सभापती महाराष्ट्र विधान परिषद, महाराष्ट्र विधान मंडळ सचिवालय, विधान भवन, मुंबई यांचेकडे मागणी केलेली आहे.

मागणीचे अनुषंगाने विधान परिषद विनंती अर्ज समितीची दि. १२ जुन २०१७ कक्ष क्रमांक ८०१ आठवा मजला, विधान भवन मुंबई येथे बैठक झाली. सदर पाझर तलावाचे सर्वेक्षण करुन अंदाजपत्रक तयार करण्यात आले. अंदाजपत्रक शासनाने ठरवुन दिलेल्या आर्थिक मापदंडात असफल आहे. भुसंपादनाचे वाढीव किंमतीमुळे आर्थिक दृष्टया असफल होत आहे. परंतु त्या भागातील शेतकरी तसेच मा. विधानपरिषद सदस्य यांची मागणी असल्यामुळे सदर पाझर तलावास विशेष बाब म्हणून अधीक्षक अभियंता, लघु सिंचन (जलसंधारण) मंडळ अमरावती यांचेकडुन जावक क्रमांक/ ३५९६/ प्र.शा.-५/ सन २०१७ दिनांक ३०.११.२०१७ अन्वये एकुण किंमत २,६२,५८,९००/- रुपयास तांत्रीक अनुमती प्रदान करण्यात आलेली आहे.

पाझर तलावासाठी एकुण ७.४५ हेक्टर खाजगी जमिन संपादित करणे आवश्यक आहे. भुसंपादना करिता एकुण १,६३,६८,२५०/- रुपयांची आवश्यकता आहे. सदर पाझर तलावाचे काम हे सन २०१८-१९ च्या जिल्हा नियोजन समितीच्या २७०२- ल.पा.सामान्य या शिर्षकाखाली समाविष्ठ करण्यात आलेले आहे. या कामासाठी ३०.०० लक्ष निधीची मागणी करण्यात आलेली आहे. सदर निधी व भुसंपादन निधी प्राप्त झाल्यानंतर अंदाजपत्रकास प्रशासकिय मान्यता घेण्याकरिता जि.प. सर्वसाधारण सभेसमोर ठेवण्यात येणार आहे.

………………………

परिशिष्ट तीन

# समितीच्या बैठका

## पहिली बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक सोमवार, दिनांक १२ जून, २०१७ रोजी दुपारी २-०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती, सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. आनंद ठाकूर, वि.प.स.

**निमंत्रित सदस्य :**

(३) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. ना. रा. थिटे, उप सचिव

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग**

(१) श्री. एकनाथ डवले, सचिव

(२) श्री. व्ही. एस दरबारे, सह सचिव

(३) श्री. दि. शा. प्रक्षाळे, अवर सचिव

(४) श्री. अ. पा. पराते, अधिक्षक अभियंता, जलसंधारण मंडळ, अमरावती.

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव (जलसंधारण) व अन्य अधिकाऱ्यांच्या साक्षी नोंदविल्या.

## दुसरी बैठक

विधानपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक शुक्रवार, दिनांक २३ फेब्रुवारी, २०१८ रोजी दुपारी ४-०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(१) प्रा. जोगेंद्र कवाडे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(२) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

**विभागीय अधिकारी, ग्रामविकास व जलसंधारण (जलसंधारण) विभाग**

(१) श्री. एकनाथ डवले, सचिव

(२) श्री. वि. सि. वखारे, सह सचिव

(३) श्री. दि. शा. प्रक्षाळे, अवर सचिव

(४) श्री. स. रा. शिंदे, अवर सचिव

(५) श्री. व्ही. पी. फुलसुंगे, कार्यकारी अधिकारी, लघुसिंचन, जिल्हा, परिषद यवतमाळ.

समितीने विनंती अर्जाच्या संदर्भात विनंती अर्जदारांच्या तसेच विभागीय सचिव (जलसंधारण) व अन्य अधिकाऱ्यांच्या साक्षी नोंदविल्या.

## तिसरी बैठक

विधनपरिषद विनंती अर्ज समितीची बैठक मंगळवार, दिनांक २० मार्च, २०१८ रोजी दुपारी १-०० वाजता कक्ष क्र. ८०१, आठवा मजला, विधान भवन, मुंबई येथे आयोजित करण्यात आली होती. सदरहू बैठकीस खालील सन्माननीय सदस्य व अधिकारी उपस्थित होते.

**उपस्थिती :**

(१) श्री. माणिकराव ठाकरे, माननीय उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद तथा समिती प्रमुख.

(२) श्री. नागोराव गाणार, वि.प.स.

(३) श्री. शरद रणपिसे, वि.प.स.

**विशेष निमंत्रित**

(१) ॲड. रामहरी रुपनवर, वि.प.स.

(२) ॲड. हुस्नबानू खलिफे, वि.प.स.

**महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय**

(१) श्री. विलास आठवले, उप सचिव

(२) श्री. संजय कांबळे, अवर सचिव (समिती)

(३) श्री. नितलेश भालेराव, कक्ष अधिकारी.

सदर बैठकीत समितीने प्रारूप अहवालावर विचारविनिमय करून तो संमत केला.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई